# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/11/2023 (बुधवार) सायंकाळ

---

### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

### पोलीस स्टेशन उमरेडची कारवाई

पोस्टे उमरेड अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा बोरगाव कलांद्री येथे दिनांक १४/११/२०२३ चे १४.०० वा. ते १४.१५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन उमरेड येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद घटनास्थळी दहा चक्का टाटा टिप्पर क्र. एम. एच.– ४०/ बी एल– ४७१८ चा चालक संशयितरीत्या येतांना दिसला. सदर वाहनास थांबण्याचा इशारा दिला असता वाहन चालक वाहन न थांबवता पळू लागला. फिर्यादी हे मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे सह शासकिय वाहनाने टिप्परचा पाठलाग करीत असता सदर टिप्पर हे नागपुर मार्गे बावीस मैल पासुन बोरगाव कलांद्री रोडने जातांना दिसुन आल्याने त्याचा पाठलाग करीत असता सदर टिप्पर चालकाने आपले वाहन हे बोरगाव कलांद्री गावाजवळ उभे करून कॅबीनचे खाली उतरून अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. त्या टिप्परची पाहणी केली असता सदर टिप्पर मध्ये चालक मालक मिळुन आले नाही. तसेच टिप्पर मध्ये गौण खनीज रेती दिसुन आली. सदर रेती परवाना टिप्परच्या कॅबीनमध्ये पाहणी केली असता गौण खनिज रेती बाबत कोणत्याही प्रकारचा परवाना दिसुन आले नाही. सदर फरार टिप्पर चालकाचा शोध उमरेड पोलीसांनी घेतला असता टिप्पर चालक मालक नामे– **अर्शद खान अज्या खान, वय २२ वर्ष, रा. खरबी नागपूर** यास ताब्यात घेतले. टिप्पर चालक मालक हा विना परवाना अवैधरीत्या गौण खनिज रेतीचे वाहतुक करीत मिळुन आल्याने सदर टिप्पर सह रेतीचा वजन केला असता ४०५१५ किलो ग्रॅम असे आहे त्यात अंदाजे ०५ ब्रॉस रेती किंमती ३००००/– रू. चा मुद्देमाल व टिप्पर वाहनाची किंमती १२०००००/– रू असा एकुण १२३००००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोउपनि रविन्द्र वाघ नेमणुक पोस्टे उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि सहकलम ४८ (७) जमिन महसुल अधिनीयम १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि रविन्द्र वाघ मो. क्र. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर